**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०५ यांची जबानी**
मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :–

**माझे नाव** : **सुभाष चंदनमल भंडारी**,
वय : ७३ वर्षे, पेशा : बियाणे व्यवसाय,
राहणार : कुकाणा, ता.नेवासा, जि. अहमदनगर.

**शपथेवर सरतपास अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती सिमा शेख :**

माझे गेल्या ३०–४० वर्षांपासुन बी–बियाणांचे दुकान हे कुकाणा, ता.नेवासा, जि.अहमदनगर येथे आहे व त्या दुकानाचा संपुर्ण कारभार मी स्वत: पाहतो. मी महाराष्ट्र कृषी उद्योग महामंडळ यांचा वितरक आहे. माझे दुकानात लागणारा माल म्हणजेच फर्टीलायजर्स, १८१८१०, तसेच इतर कंपन्यांचा माल म्हणजे १०२६२६ पोटॅश हे देखील मी महाराष्ट्र कृषी उद्योग महामंडळ यांचेकडुन विकत घेत असतो.

२. मी महाराष्ट्र कृषी उद्योग महामंडळ यांचे कर्मचा–यांना ओळखतो. त्यांची नावे राजेंद्र होले, राजुरकर, शिपाई नामे रामदास अशी आहेत. मी महाराष्ट्र कृषी उद्योग महामंडळ यांचेकडुन खरेदी केलेल्या मालाबाबतचे पेमेंट हे मर्चंट को.ऑप बॅक येथील धनादेशाव्दारे करत असतो. सदर धनादेशाचा क्रमांक मला आता आठवत नाही.

३. मला नंतर कळाले होते की, मी दिलेल्या मर्चन्ट को.ऑप. बॅकेच्या धनादेशांव्यतिरिक्त, माझे नावावर काही धनादेश हे महाराष्ट्र कृषी उद्योग महामंडळ यांच्याकडे जमा करण्यात आलेले होते. सदरचे धनादेश हे सदर महामंडळातील कर्मचा–यांनी म्हणजेच राजेंद्र होले, राजुरकर, शिपाई नामे रामदास यांनी केल्याचे मला कळाले होते. त्यानंतर काय झाले होते हे मला माहिती नाही. पोलीसांनी

SACHIN RAJARAM SHINDE
Digitally signed by SACHIN RAJARAM SHINDE
DN: cn=SACHIN RAJARAM SHINDE, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6949745, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2025.09.18 13:55:40 +0530

माझेकडे चौकशी करून माझा जबाब देखील नोंदविला होता.

सरतपास पुर्ण.

**शपथेवर उलटतपास आरोपी क्र.१ तर्फे त्यांचे वकील श्री.मोरे :**

४. हे म्हणणे खरे आहे की, आता माझे वय झाल्याने माझा मुलगा देखील सगळे व्यवहार पाहत असतो. हे म्हणणे खरे नाही की, माझा मुलगा माझे व्यवहाराचे देणे-घेणे पाहत असतो. साक्षीदार स्वत:हून सांगतात की, आजरोजी देखील ते स्वत: त्यांचे व्यवहाराचे देणे घेणे पाहत असतात. माझे दुकानाचे महामंडळाशी असलेल्या व्यवहाराबाबतचे सर्व पेमेंट मी महामंडळाला दिले होते व त्याबाबतचे पेमेंटच्या नोंदी या माझे कृषी महामंडळाच्या माझे नावे असलेल्या खात्यावर जमा करण्यात आलेले आहेत. महामंडळाचे रेकॉर्ड मी स्वत: पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझा व महामंडळाचा असणारा व्यवहार मी रितसर संपवलेला आहे व आजरोजी माझे काही देणे-घेणे सदर महामंडळाशी नाही.

५. मी व्यवसाय करत असल्याने शेतक-यांच्या उधारीचे लेजर खाते मी जतन केलेले आहे. हे मला सांगता येणार नाही की, नजरचुकीने एखादी नोंद इकडे-तिकडे होवु शकते का नाही. हे म्हणणे खरे आहे की, महामंडळाचा वितरक होण्यासाठी करार करावा लागतो. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१५-२०१६ साली माझा महामंडळाशी करार नव्हता. मी महामंडळाशी गेल्या ४० वर्षांपासुन व्यवहार करत आहे. मी महामंडळाशी एकदा करार केलेला आहे. सदर कराराची मुदत किती वर्ष होती हे मला माहिती नाही. सदरचा करार मी स्वत: केला होता. सदर कराराची प्रत आजरोजी माझेकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे नावावर राजेंद्र होले, राजुरकर, शिपाई नामे रामदास यांनी कुठलीही नोंद केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, आजरोजी न्यायालयात साक्षीकामी आल्यावर मी माझे

जबाबाचे अवलोकन केले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर जबाबाचे अवलोकन करून आजरोजी साक्ष देत आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतात की, वस्तुस्थिती बाबतच ते साक्ष देत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मला शिकवल्यानुसार मी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी हे खोटे सांगत आहे की, माझे नावावर कोणाचेतरी धनादेश जमा करण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, महामंडळाशी व्यवहार हा धनादेशाव्दारे होत असतो व तो रोखीने होत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी वेगवेगळया कंपन्यांचे खत माझे दुकानात ठेवत असतो. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेला मजकुर खोटा सांगत आहे.

**<u>शपथेवर उलटतपास आरोपी क्र.२ व ३ तर्फे त्यांचे वकील श्री.व्ही.आर. गुंदेचा</u> :**

६. हे म्हणणे खरे आहे की, मी धनादेशाव्दारे महामंडळाला पैसे दिल्यानंतर त्याबाबतचे व्हाउचर महामंडळ तयार करत असते. हे म्हणणे खरे आहे की, दरवर्षाच्या शेवटी महामंडळाकडुन, त्यावर्षी मी सदर महामंडळाशी केलेल्या व्यवहाराबाबतचा खातेउतारा मला देण्यात येत असतो. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा खातेउतारा हा मला देण्यात येत असतो कारण त्याबाबतच्या नोंदींची मी खातरजमा करावी. हे म्हणणे खरे नाही की, खोतउतारा मिळाल्यानंतर व त्याची खातरजमा झाल्यानंतर मी त्यावर सही करून देत असतो. माझेकडुन आजरोजीपर्यंत मला देण्यात आलेल्या खातेउता–याचे कन्फरमेशन महामंडळाकडुन घेण्यात आलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, महामंडळ माझेकडे खातेउता–या संदर्भात कन्फरमेशन घेण्यासाठी कधीही आलेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, तपासादरम्यान महामंडळाने मला दिलेला खातेउतारा तसेच महामंडळाला देण्या–घेण्याबाबतचे माझे रेकॉर्ड मी तपासी अधिका–यांना सादर केला नव्हता. जरी खातेउतारा मी पोलीसांना तपासादरम्यान दिला नसला तरी त्यामध्ये नोंदविण्यात आलेल्या चुकीच्या नोंदीबाबत मला सांगता येईल. साक्षीदार स्वत:हून सांगतात की,

SACHIN RAJARAM SHINDE
Digitally signed by SACHIN RAJARAM SHINDE
DN: cn=SACHIN RAJARAM SHINDE, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6949745, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2025.09.18 13:55:47 +0530

सदर खातेउता–यात दोन चुकीच्या नोंदी नोंदविण्यात आलेल्या आहेत.

**प्रश्न** – तुम्ही स्वत: महामंडळाकडे तुम्हाला देण्यात आलेल्या खाते उता–यातील चुकीच्या नोंदीबाबत लेखी तक्रार दिली होती काय ?

**उत्तर** – पोलीसांनीच सदर प्रकरणाबाबत चौकशी केल्याने मला लेखी तक्रार देणे आवश्यक वाटले नाही.

७. पोलीसांनी माझी चौकशी करेपर्यंत महामंडळातील खातेउता–यातील चुकीच्या नोंदीबाबत मी कोणाकडेही तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, महामंडळाचे मुख्य कार्यालय नाशिक येथे आहे व तेथील अकाउंट विभागाच्या प्रमुख या श्रीमती शैलजा दाणी या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदर अकाउंट विभागात कोण नोंदी करतात, काय नोंदी करतात याबाबत व्यक्तीश: मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, राजेंद्र होले व राजुरकर हे महामंडळाचे कर्मचारी विक्री विभागात कार्यरत असून ते विक्री कामी माझेकडे येत असत. हे म्हणणे खरे आहे की, माझे खातेउता–यातील चुकीच्या नोंदी या राजेंद्र होले व राजुरकर या महामंडळाच्या कर्मचा–यांनी केल्याची बाब मला महामंडळाकडुन कळविण्यात आली होती. साक्षीदार स्वत:हून सांगतात की, महामंडळाचा कारभार राजेंद्र होले व राजुरकर हेच पाहत होते व त्यामुळे त्यांनी चुकीच्या नोंदी केलेल्या आहेत हीच वस्तुस्थिती आहे.

**प्रश्न** – सदरचे जादा पेमेंट तुम्ही संबंधित व्यक्तीला परत केले नाही हे खरे आहे काय?

**उत्तर** – सदरचे जादा पेमेंट माझेकडे आलेच नव्हते केवळ माझे खाते उता–याला चुकीच्या नोंदी करण्यात आल्या होत्या.

८. हे म्हणणे खरे नाही की, केवळ महामंडळाच्या तसेच फिर्यादीच्या सांगणवरून सरतपासातील मजकुर सांगितलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की,

आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

(न्यायालयात साक्षीदारासमक्ष असणा–या स्क्रीनवर साक्षीदाराचा संपुर्ण जबाब हा साक्षीदाराला वाचुन दाखविण्यात आला व त्याने त्याबाबतची काहीही तक्रार नसल्याचे सरकारी वकीलांसमक्ष तोंडी सांगितले.)

माझे समक्ष जबाब श्रवणोत्तर स्वीकृत,

SACHIN RAJARAM SHINDE

Digitally signed by SACHIN RAJARAM SHINDE
DN: cn=SACHIN RAJARAM SHINDE, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6949745, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2025.09.18 13:55:54 +0530

**(एस.आर. शिंदे)**

**दि.१८/०९/२०२५**

अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१८, अहमदनगर.